## आयकॉल ची वैशिष्ठे

→ प्रशिक्षित व्यावसायिक समुपदेशन सेवा

→ कार्यकाल अवधीमध्ये दूरध्वनी मार्ग व्यस्त असणार नाही

→ प्रत्येक ईमेल व ट्विटर/फेसबुक संदेशाला २४ तासात प्रतिसाद

→ पूर्णत: गौपनीयता - तुमचे नाव अथवा फोन नोंदविण्याची आवश्यकता नाही संभाषण ध्वनिमुद्रित केले जात नाही.

→ तुम्ही तुमचे समाधान होईपर्यंत, कितीही वेळ बोलू शकता आणी तुमचे सर्व बोलणे संयमपूर्वक ऐकले जाते.

→ मिळणारा भावनिक आधार हा न-निर्णायक (non judgmental) असेल आणी तुम्ही कोणत्याही विषयावर बोलू शकता.

→ विविधतेचा आदर- प्रत्येक समुपदेशक अल्पसंख्यांक/ दूर्लक्षित समुदायाच्या समस्यांबाबत संवेदनशील आहे.

iCALL
PSYCHOSOCIAL HELPLINE

०२२ - २५५२११११
सोमवार ते शनिवार
सकाळी ०८ ते रात्री १० वाजेपर्यंत

icall@tiss.edu
www.facebook.com/helplineicall
@iCALLhelpline

iCALL
PSYCHOSOCIAL HELPLINE
०२२ - २५५२११११
सोमवार ते शनिवार
सकाळी ०८ ते रात्री १० वाजेपर्यंत
icall@tiss.edu

स्कूल ऑफ ह्यूमन ईकॉलोजी, टाटा सामाजकि विज्ञान संस्थान
भविष्य की पुनर्कल्पना RE IMAGINING FUTURES
TISS

## प्रकल्पाची पारश्र्वभूमी

समाजसेवा शिक्षणाचे पहिले महाविद्यालय म्हणून १९३६ मध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेची (TISS) स्थापना करण्यात आली. सामाजिक न्याय आणि समाजसेवा या क्षेत्रामध्ये टाटा सामाजिक विज्ञान संस्थेने नेहमीच पथदर्शी भूमिका बजावली आहे. गेल्या ७५ वर्षात TISS ने नवनवीन अभ्यासक्रम आणि कार्यप्रकल्पाची सुरवात करून बदलत्या सामाजिक वास्तवाचा मागोवा घेतला आहे. या कार्यप्रकल्पाच्या माध्यमातून विविध गटातील व्यक्तीच्या मानसिक गरजा पुरवण्याचा प्रयत्न केला आहे. आणि या कमी अभ्यासलेल्या क्षेत्रासाठी वेगवेगळया इलाज योजनांचा वापर केला गेला आहे.

## आयकॉल विषयी थोडे काही...

भारतातील मानसिक आरोग्याची समस्या, मानसिक आरोग्याच्या सोयींचा तुटावडा आणि तुटपुंज्या तज्ज्ञ आणि प्रशिक्षितांमुळे अधिक तीव्र झाली आहे. मानसिक आरोग्याच्या प्रसारामधील हे दोन मुख्य अडथळे आहेत. मानसिक आरोग्यासंबंधीच्या सोयीसुविधा मधील एक पुरोगामी माध्यम म्हणजे (हेल्पलाईन दूरध्वनी मदत यंत्रणा) समुपदेशन. अंतराचा अडथळा दूर करण्याकरता हेल्पलाईन हे अत्यंत उपयुक्त असे माध्यम आहे. आधुनिक तंत्रज्ञाच्या आगमनामुळे हेल्पलाईन सुविधेचा लाभ घेण तुलनेने सोपे झाले आहे.

अशा हेल्पलाईन बहुतेकवेळा आधार अथवा भावनिक प्रथमोपचाराचे काम करतात. ही सुविधा तात्काळ उपलब्ध होणे अनाम राहता येणे आणि गोपनीय मदत हे प्रमुख फायदे आहेत.

या माध्यमातून व्यक्तीला उत्तम माहिती संदर्भ सेवा मिळू शकते आणि ती व्यक्ती ज्ञान व सेवा स्त्रोतांशी जोडली जाते. उच्च दर्जेचे समुपदेशन आणि इंटरनेट माध्यमातून आधार सेवा देणे हे आयकॉलचे उद्दिष्ट आह. यामुळे सामाजाचेआणि व्यक्तीचे मानसिक आरोग्य उत्तम राहण्यासाठी लक्षणीय प्रगती साधता येऊ शकेल.

टाटा सामाजिक वीज्ञान संस्थेची आयकॉल ही हेल्पलाईन गरजवंतांना मनो-सामाजिक समुपदेशन आणि भावनिक आधार देण्याच्या हेतूने विकसित करण्यात आली आहे.